विषय काव्य
सं. क्र. २४०९

# वाळुचा प्रियकर

REFBK-0022775
REFBK-0022775

मलिका अमर शेख

२२७७५
९।१२।१७
संदर्भ शा

# ॥ वाळूचा प्रियकर ॥

मलिका अमर शेख

REFBK-0022775
REFBK-0022775

सर्व हक्क लेखिकेचे स्वाधीन

पहिली आवृत्ती : २९-८-१९७९

किंमत : दहा रुपये



मुद्रक व प्रकाशक : श्रीमती ज्योति अमर शेख
शाहीर अमर शेख रोड, मुंबई ११

ज्यांनी मला शब्द दिले, सूर दिले
त्या माझ्या वडिलांना
आणि
ज्यांनी शब्दासाठी
कलेसाठी
आयुष्य झुगारून दिले
व्यथेच्या माळरानावर
दारिद्र्याच्या काटेरी कुंपणावर
त्या सर्व
महान कलावंतांना......

—मलिका अमर शेख

## दोन शब्द

कविता लिहिल्या. कवितेबद्दल काय लिहावं ? शब्द प्रेक्षक होऊन आता समोर बसलेत. कवितेनं मला आयुष्यात एक अर्थ दिला असं म्हणण्यापेक्षा मी कवितेला काय दिलंय् या प्रश्नाचं उत्तर आज मला तुमच्यासमोर द्यायचंय्. ते फार कठीण आहे. मी एकच सांगू शकते, मी माझ्या कवितेशी प्रामाणिक आहे—असेन.

या कवितासंग्रहात प्रत्येक कवितेत 'मूडस्' बदलत गेलेत. कोपऱ्यात कुठं तरी ठामपणं उभं असलेलं माझं व्यक्तिमत्त्व, माझं अस्तित्वही बदलत गेलंय्. 'वाळूचा प्रियकर' या कवितेपासून मला माझं एक हरवलेलं अस्तित्व सापडलं; पण म्हणून मी रोमँटिक हळुवार कविता करणारी असा शिक्का नकोय् मला. कवी आणि कविता कधीच कुठल्या फूटपट्टीनं आणि मापानं मोजू नये.

काही कवितांचा मूड उसना वाटतोय्, विसंगत वाटतोय, कबूल. पण मी त्या कविता लिहीत गेले तेव्हा तेवढ्याच उत्कटपणे त्या जगले होते, जितकी मी माझ्या इतर कवितात जगले. कुठल्याही वादळात उगाचच उद्ध्वस्त होणं हा त्याग खोटा असतो; पण ते वादळ खोटं नसतं....वाहून जाण्यातली बेहोषी खोटी नसते.

१५–८–७९ मलिका अमर शेख

## अनुक्रमणिका


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | शरीरसूक्त | .... | .... | ९ |
| २ | तू एक कॉम्रेड | .... | .... | १४ |
| ३ | निऑन साईनचा नितळसूत रस्ता | .... | .... | २० |
| ४ | सजवलेल्या बिजवर शब्दांनी | .... | ... | २५ |
| ५ | चौथऱ्यांनीही पंख लावून | .... | .... | २६ |
| ६ | आपण सर्व टांग्याचे घोडे | .... | .... | २८ |
| ७ | माझ्या मरतेल्या जाणिवा | .... | .... | ३२ |
| ८ | योद्धा | .... | .... | ३३ |
| ९ | उद्ध्वस्त | .... | .... | ३४ |
| १० | वादळ | ... | .... | ३५ |
| ११ | चकवा | .... | .... | ३७ |
| १२ | संध्याकाळ | .... | .... | ३९ |
| १३ | आषाढ | .... | .... | ४१ |
| १४ | प्रतीक्षा | .... | .... | ४२ |
| १५ | रुसलेल्या बहराला | ... | ... | ४४ |
| १६ | स्वप्नांचा फास | ... | ... | ४५ |

अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १७ | माझ्या पालखीची वाट | ... ... | ४६ |
| १८ | निःसंग | ... ... | ४७ |
| १९ | विद्रोह | .... .... | ४८ |
| २० | माडीवर | .... .... | ५१ |
| २१ | रद्दबातल ठरवलेले | .... .... | ५३ |
| २२ | संभावित सूर्यासारखे | .... .... | ५५ |
| २३ | आम्ही अश्वत्थामा | .... .... | ५७ |
| २४ | आम्ही नाही आहोत राजहंस | .... .... | ५९ |
| २५ | पिरॅमिड्स | .... .... | ६२ |
| २६ | वाळूचा प्रियकर | .... .... | ६४ |
| २७ | मी सावलीत बसून ऊन पहात होते ते दिवस | ... | ६६ |
| २८ | रात्रीचा पहिला प्रहर | .... .... | ६९ |
| १९ | एक सूडचक्र | .... .... | ७० |
| ३० | भंगारात टाकलेलं त्याचं आयुष्य | .... .... | ७२ |
| ३१ | पुन्हा एका शहराची आत्मकथा | ... ... | ७३ |

## शरीर सूक्त

अनेक आरसे बिलोरी फुटलेले माझ्याप्रमाणे
उरलेल्या तुकडचांनी प्रकाशाला दिलेला अर्थ अपरिहार्यपणे
तसाच माझ्या छिन्नविछिन्न दगडी शरीराने
दिलेला अर्थ आयुष्याला

रात्र पेटत जाते अंगांगातून
असे अनेक बहकते बेदर्दी वेडे श्वास
झिल घेतलेले ज्वालामुखी धुमसलेले वडवानल अदय
चंद्रावलेल्या किरणांनी विझत जातात

नको असून...नको असून किती गोष्टी घडत जातात
वळत असतात वासनेच्या हिरवट शेवाळत्या गंधाकडे
अटळ असलेला संभोग
चार दिवसांचं अटळ किळसलेलं शरीर
आयुष्यालाही विटाळ झालाय माझ्या

ळवांसारख्या डसतात नग्न रात्रीं जीवघेण्या
ाहक विषारी सर्पांचे फूत्कार सर्व अंगांगाला
महारोग्यासारखं शरीर झडावं सडावं कुजावं मरावं
होत नाही तसं
कात टाकता येत नाही

जांभळचा रक्ताळलेल्या वेदना
वक्षावर फुललेली तात्पुरती दगडी फुलं
नेहमीच्याच वेदना पहिलेपणाच्या अतीव धुंदीत
सादर समर्पण केल्याचा झूठा आविर्भाव

उमटलेल्या ताज्या खुणा मळक्या पायवाटेवर असाव्या तशा
विझतीलही उद्यापर्वा काजळलेल्या शिळचा वेदना
उचकटलेलं अवघं फत्तरमय शरीरनामक करपलेलं क्षितिज
ओलांडून पुढं जाणारा कोणता सूर्य आहे ?

अंतराय किरणांची वाट पहात
आदिम मर्यादशील भारतीय आर्यनारी संस्कृतीच्या
दैदीप्यमान परंपरेला संभाळत
ही प्रतिष्ठित वेश्या उभी आहे
गटारगंगेत हजार पुरुषांच्या वासनामय वीर्यपुरात
स्वतःचं अस्तित्व विर्घळवत

आजवर ऐकलेत नुस्तेच शद्बांचे तमाशे
न पाहिलेल्या अनौरस क्रांतींची बेछूट वर्णने

भोगलेले अशरीर सडलेले आत्मे
रस्त्यांशी संभोग करायलाही मागंपुढं पहाणार नाहीत
स्त्रीला युगानुयुगं राहिलेला हा एक गर्भ – वेदनांचा
हा एक संभोग-आयुष्याशी आयुष्यभर
बेईमानपणे स्वतःला विझवून करत असलेला

उत्तर नसलेल्या प्रश्नाला प्रश्न विचारत
निराकार निर्गुण अशरीर असलेल्या
विटाळशा आयुष्याला पुन्हा पुन्हा कवटाळत
नसलेल्या अस्तित्वाला संभोगाचा अर्थअनर्थ

सोळाव्या वर्षातलं पहिलं रक्तफूल उमलून न्हालेलं
कोवळच्या वयात आकाशाऐवजी फुटपाथ पांघरून
स्वतःला विकायला बसावं
हजार रात्रींच्या अश्वत्थामी चिरंजीव जखमा
निर्विकारपणे भोगाव्या
'नॅचरल प्रोसेस' असणाऱ्या अटळ चार दिवसांतही
'नॅचरल प्रोसेस' संभोग करावा

न तुटणाऱ्या नाळेचा देठ
ॲडमच्या फळासारखा तोडून
रक्ताच्या पुराला थोपवून
त्यावर दगडी चौथरा बांधावा
मरतेल्या आयुष्यावर आशेचं सूत धरावं
सायसाखर पेरावी फुलदाणी स्वप्नांची

गर्भरेशमी सावली निखळ अदृश्य सुखाची
सावली फसव्या वटवाघळाची असेना का
जळलेल्या अर्ध्यामुर्ध्या पापण्यांच्या पिसाऱ्यानं
संभोगाचे पापलक्षी वेदनाशील व्रण पुसावे
अमृतमयशा दुधाळ धारेसाठी
क्षितिजानं पुन्हा सजावं नव्या सूर्यासाठी

आठवतात नवथर रात्री
दाटून येतात अंगभरून जळजळीत सूर्य
ग्रीष्माचं ऊन पेरीत रक्तफुलात
स्तनावरल्या व्रणभरल्या वेदना ठसठसतात
धुमसतात ज्वालामुखीसारख्या
उगवत्या सूर्यासारख्या लसलसत अग्निजिव्हा
अशीही कुंती असावी का ?
पाच पतिव्रता पंचकन्यांची नावं काय बरं?
.......................

...अखेर प्रत्येकाच्या आयुष्यात
एक नाका येतो अपरिहार्यपणे
तो फोरासरोड असतो
खाजकुयलीसारखं तुमचं आयुष्य खाजवत असतो
खिजवीत असतो
हसत असतो

झाडाझाडावर असलेल्या तुमच्या फाल्तू बकबकीला
आणि तुमच्या डोळस रेखीव रंडीबाजपणाला

सूर्याशी समागम करणारी कुंती स्त्री होती
शरीराचं नातं सूर्यफुलाशी जोडणारी

फुटपाथला कवेत घेणारी
रापलेल्या उन्हात अन् तडे गेलेल्या
अंधाराच्या तुटक्या-फुटक्या काचांना उरात घेणारी
तुमच्या वीर्याचं तीर्थ घेऊन
खिडकीखिडकीत तुमच्या सतेज आकांक्षांच्या
फाटक्या तंबूशेजारी स्मशान बांधून
घुबडा-गिधाडांची अंडी पिल्लं उबवणारी

कोण जातंय् ते अभेद्य गुहेवरून
स्त्री स्वातंत्र्याची पिचकी तुतारी फुंकत

–रजस्वला
संभोग
बाळंतपण
शरिराभोवती फिरलेलं आयुष्यासकट माणसांचं चक्र
मुक्या वेदनांचं वेटोळं
झोपताना माझ्या चौथऱ्याची आठवण ठेवाल का
सूर्यतीर्थाच्या आकाशपक्षांनो?

० ० ०

## तू एक कॉम्रेड

तू कर्तव्यकठोर नियमांचा आदिअंत
काळाचा निर्भय साक्षीदार
क्षितिजापलिकडून उगवतीकडे चाललेल्या सूर्याचा साथीदार
माझ्या पारदर्शीपणातून तू पहातोस आरपार
लावतोस माझ्या मनाच्या रूक्ष वाळवंटात
ओल्या इतिहासाची झाडं
माझ्यातल्या मीपणाच्या अस्तित्वाची करतोस उलटतपासणी
न् तुला रस्तोरस्ती दिसणाऱ्या निखळ सत्यात
मला लपेटून घेतोस

तू एक कॉम्रेड
लोकांच्या नकारगर्भ जीवनातून स्वतःचं आयुष्य शोधणारा
मी हरवून गेलेय् तुझ्यात
तुझ्या मनाचं अस्तित्व हे सर्वांच्या चैतन्याचं प्रतिक

तू जातोस रात्रीबेरात्री फिरतोस
बारा गावच्या मुंज्यासारखा
दार खाडखाड वाजवतोस
न् प्रत्येक घरात एक विस्तव पेटवून जातोस
ज्यांचे हात भाजले विस्तवाचा स्वीकार करताना
ते थोडेफार कुरकुरले

ठीक आहे
साडेतीन हजार वर्षाच्या अंधारानंतर उजेडाचा
कवडसासुद्धा त्यांचे डोळे दिपवील
पण म्हणून तू सूर्य व्हायचं नाकारू नकोस

मुळापर्यंत शोषल्या गेलेल्या शुष्क लोकजीवनाला
तू पाणी न् जमिनीप्रमाणे स्वच्छ न् ताठ
दलाल लोकांनी लादलेल्या कलंकासकट
तू अपरंपार लोकात व्याप्त

तुझ्या भाबड्या मनाला कळलंच नाही कधी
सत्य गर्जून सांगणारा मोठा गुन्हेगार होतो या देशात
ताठ मानेनं तू फासावर गेलास
ह्यांच्या गुन्हेगारी दृष्टीनं
तरी तू झोपडी झोपडीत पेटवलेला विस्तव
अंतिम निखळ सत्य सांगेल

तू कॉम्रेड आहेस
तुझ्या शरिरावर अनेक पहाटा फुलतायत

त्याच्यावर सर्वांचा जन्मसिद्ध हक्क तूच वाटलास
मुक्तपणे दिलंस उधळून सारसर्वस्व
तू गेलास तुरुंगात
तू मेलास गोळीबारात, तर
तू दिलेली मशाल धरुन तुला मानवंदना देण्यापलिकडे
आमचं असं काय आहे

तू आमच्यात विस्तारलेला
तू आमच्या परिघाची त्रिज्या
वर्तुळ ओलांडून जाणारा
सूर्यसुद्धा मर्यादित लक्ष्मणरेषा जपतो
त्याच्या सूर्यमंडळात
समुद्राची आवेगभरतीही मर्यादित
पण हे तुझं अमर्यादित अथांगपण
त्याला ओहोटी लागेल म्हणून खचू नकोस
हे सूर्यमंडळ लाजून तुझ्या पायाशी आलेलं
तू उंचच उंच

तू कॉम्रेड आहेस–
पण ह्या काळीज नसलेल्या
दरिद्री लाचार देशातला
हेच तुझे दुर्दैव आहे

पण अखेर तू कॉम्रेड हे कुणी नाकारणार नाही
हा तुझ्या विचारांचाच विजय

आम्ही नुसतं खिडकीपलिकडे पहाणारी माणसं
तू खिडकी तोडून पलिकडे जाणारा
आम्ही हत्यार बनवून बळी जाणारे
तू हत्यार देऊन शत्रू दाखवणारा
काय आहे आणि काय असावं
यातला फरक जाणणारा आंधळ्यांमधला डोळस तू
हा फरक तू कॉम्रेड म्हणूनच

हात लावताच पटकन् लाजून मिटणाऱ्या
लाजाळूच्या झाडानं तुझ्यावर थुंकण्याची
हिंमत का करावी?
तू जिझस आहेस का
या चुकलेल्या अजाण लेकरांना क्षमा करणारा
डोक्यावर छप्पर
पायाखाली हक्काची जमीन
आणि पोटात अन्न नसलेला चारचौघांसारखा तू

जातीधर्माचं बाजारू भांडवली राजकारण न करता
फासाच्या तख्तावर चढलास तर नवल नाही
तू ते करत नाहीस हाच एक गुन्हा आहे

भांडवली अर्थरचना जाळायला निघालेल्या
तुझ्या पेटत्या डोळ्यांना आणि मनाला
कुठल्या तुरूंगात बंद करणाराहेत हे सरकारी कुत्रे
तू एका प्रकाशयात्रेला निघालेला

तुझी वाट मळकी म्हणणारांनी
आधी आपले पाय धुवून यावेत

तर बरं का कॉम्रेड
या स्वतंत्र देशात चामडीबचाव धोरण
न स्विकारलेला माणूस तू
बेड्यांनी बांधलेले हात पुढं येतात
ते बेड्या तुटण्यासाठी हात नव्हे
बंधमुक्त हातांनी पहिला लाल सलाम
तुझ्यासाठी राखलेला
पण तोपर्यंत तरी तुझं दुःख बेहिशेबी

तुझ्या दोषांचे डोंगर
हे सगळं पचवून तू पहाडाप्रमाणे ताठ
तुझ्या अंतर्यामी सतत पेटलेला होम
त्यात तुझ्याबरोबर आमच्याही ईच्छा सर्वस्वाचा होम
सर्वांपासून वंचित केले गेलेलो आपण

तू दाखविलेला प्राप्त मार्ग
झापडं बांधलेले काही कैदी स्विकारणार नाहीतही
पण तू मैलांचे दगड रोवत जातोसच त्यांच्यासाठी

ब्रूटस्नी मारलेला सिझर का तू ?
मनापासून एवढंच वाटतं
तू सिझर असो

किंवा कॉम्रेड किंवा चेअरमन
किंवा साधा बंडखोर क्रांतीकारक
तुला कुणा ब्रूटस्‌च्या हाती मरण येऊ नये
कारण तू कॉम्रेड आहेस

रणांगणावर क्रांतीसाठी लढत मरण तुझ्यासाठी असावं
तेव्हा तुला लाल सलाम म्हणताना
आमची मान ताठ असेल
आणि एक पाऊल तुझ्याही पुढे !

० ० ०

## निऑन-साईनचा नितळसूत रस्ता

निऑनसाईनचा नितळसूत रस्ता
वफादार कुत्र्यासारखा वहात असतो
तसंच वळणानं जाताना उध्वस्त होतो आमचे आम्ही
याचा अर्थ असा नव्हे आम्ही बेईमान झालो

संगिनीचा वीजस्पर्शी सर्वनाशी कल्लोळ कानात साठवून
विझलेल्या शहरातून फिरलो
निशीगंधाची फुलं घेऊन
याचा अर्थ असा नव्हे
आम्ही विझलेलो आहोत

चहुकडे मृगजळ न्
देह झंकारतो सतारीसारखा
सूर सैरावैरा धावत सुटतात
विझलेल्या शहरात हेल्मेट घालून निघतात

जशी गुलमोहराची रक्ताळती फुलं
तसे आम्ही निघतो
दिशा, वारा, पाणी सर्व आमचं असतं
असे निघतो आम्ही पेटून कडाडून
की क्षणभर पृथ्वीलाही मोह होतो कुंती होण्याचा

निळावलेल्या डोळयांनी यात सुखाचे कवडसे शोधू नकोस
रस्त्यारस्त्यांवर अंधाराचे आंधळे पूर कोसळताहेत
आपल्या डोळस हातांना कवडसे खरेदी करायचे नाहीत

पानापानांनी डोळे उघडलयेत्
प्रिये, डहुळते पापण्यांचे काठ गर्भवती होतायत्
तुझे सूर थकून निजले का
की तूच लावून ठेवली होतीस एक तार अंगाईगीतासाठी

–मी मृण्मय अशाश्वत निरावर्त
शून्यबिंदू
मध्यबिंदू
रक्तबिंदू
पण म्हणून काय झालं ?
वर्तुळत जाणारे दिशांचे कोन सांधायचे कधी राह्यलेत

–लाल अलवणाचा पदर डोक्यावर घेऊन
म्हातारी बसलीय्
दिशादिशांचा

पुरातनत्वाचा
त्यांच्या आदिम पूर्वापार सनातन रेखीव परंपरेचा
मर्यादशील कर्मयोगाचा कापूस पिंजत

शतकानुशतकाच्या युद्धभूमीवरच्या रक्ताळत्या गुठळ्या
रक्ताचा गुंता सोडवत
आदिरोध ।। प्रतिरोध
आवर्त ।। प्रत्यावर्त
रक्तांच्या पिळवटल्या धमन्यांच्या वाती वळत

अगणित हडप्पा ।। मोहेंजोदारो ।। बॉबिलोनियन ।। सुमेरियन
आणि कितीक आदिम संस्कृत्या
तिच्या ओटीपोटात कण्हत पडल्यात्

असं कसं बरं झालं ?
हातात कर्मयोग घेऊन अशोकस्तंभावरली
शांतीसूक्त पठणारा तो पांढऱ्या दाढीचा म्हातारा
कसा बरं मेला ?

थ्री नॉट थ्रीची गोळी दिस्तेय्
सुंदरशा काचघरात याचा देह 'फार्मोलिन' चोपडून ठेवू
आपण आपल्या सनातन स्मृतीचो मूल्यं जपतो
अशी अनेक काचघरं कनवटीला बांधून जात असताना
पलिकडे उभ्या असलेल्या लांब बोटांच्या
सोनेरी शहरदेहाच्या बायका बोलावतात

'इन्फ्रा रेड' किरणं शरीरात घुसवत
गर्भाशयाच्या मखमली कोशाच्या अंधारकोठडीतून
नुक्ताच बाहेर आलोय्
प्रकाशभोगी असा मी पुन्हा योनीगृहेत कशाला जाईन

—निऑनसाईनचा रस्ता विर्घळतोय्
आज पुन्हा अश्वत्थामा व्हावसं वाटतंय्
चिरंतन जखमेचा दाता
हिरोशिमा ।। नागासाकीवर ब्रह्मास्त्र सोडणारा

लाल अलवणाचा पदर दूर फडफडतो
तडफडतो
कळवळतो
लाल रक्ताची घागर सावरत
मी हेंदकळत चालू लागतो
दिशांचे हात हसू लागतात हलू लागतात

अशोकचक्र ।। धम्म ।। शांतीसूक्त विरचीत म्हातारा
मेलेला ।। लाल अलवणाचा पदर
न्यू एम्पायर स्टेट ताजमहाल
इतिहास घडवणाऱ्या गर्भवती गगनस्पर्शी तुरुंगभिंती
किती बरं सौन्दर्यखुणा उमटल्यात जगाच्या
रक्ताळ ओठावर

प्रिये, तू डेझिरी
        क्लिओपॅट्रा
        हेलन ऑफ ट्रॉय

फार दिवसांनी निद्रानाशाचा झटका आलाय्
किती बरं राजेशाही धिंड काढलीय माझ्या स्वप्नांची
अखेर हे रस्ते तिथंच मिळतात बरं
जिथं तुम्हाला मी तुमच्या नासक्या शहरासकट
फरफटवत नेईन

भडकत्या ज्वालामुखीच्या तोंडावर
लाल अलवणाचा पदर लहरतोय् लहरतोय्

ब्रम्हास्त्र + अश्वत्थामा = चिरतंन दुःख

=हिरोशिमा+नागासाकी

ॐ शांती ॐ शांती ॐ शांती

० ० ०

## सजवलेल्या बिजवर शब्दांनी

सजवलेल्या बिजवर शब्दांनी
त्यांनी माझं स्वागत केलं
जुन्याच मळक्या प्रकाशाची पाऊलवाट
त्यांनीच दाखवली
म्हटलं हेही नसे थोडके
पण त्यांचं कुंपणही जुनच होतं
तिथले काटेही शिळे झालेत

थुंकणाऱ्या नजरांना किंमत न देता
आलो तिथलं स्वतःचं अस्तित्व नाकारून
कुजणाऱ्या गटारात आयुष्य शोधलं नवं
इथले वळवळणारे किडे-जंतू नवीन होते
समाधानानं निःश्वास टाकला
इथून चंद्र जास्त स्पष्ट दिसत होता !

० ० ०

## चौथऱ्यांनीही पंख लावून.....

अशाच एखाद्या गर्भरेशमी रात्री
स्फटिकमय प्रासादातून कुजबुजणारी सावली
घरंगळत खाली येते
अचेतन वांझोटी दया बनून झाडांना बिलगते
लाजाळूचं झाड मिटतं फुलतं त्या नपुंसक स्पर्शानं

माझ्याही खिडकीतून बिलोरी काचेतून
रांगत येतात झाडं बिलगतात अंगांगाला
चंद्राचा उबदार मायाळू धीर सावरत असतो
रस्त्यारस्त्यावर लटकणारे फासावर आपले बदनाम अश्रू
सावल्यांना रोखण्याचा अयशस्वी प्रयत्न करत असतात

कुठल्या कुठल्या वाटा अडवाव्या
झाडानं आपल्या फांद्या पसरल्यात
सावल्यांचं ओरडणं भुतासारखं भेसूर

विर्घळत असतो आपण क्षणाक्षणानं
रक्तामासाच्या चिखलाचा केलेला सूर्य
कोणत्या क्षितिजावर उगवणार आहे
चौथऱ्यांनीही पंख लावून उडायला सुरूवात केलीय !

–गटारातल्या माशांनी पापण्या नसलेले डोळे
किती वेळ बंद ठेवावे
आभाळ खांद्यावर घेणारे हात थकलेले नाहीयत
प्रकाशाचा गर्भ उरात घेऊन कष्टलेले आभाळ

क्रांतीपुत्र सूर्यपुत्र अग्निपुत्र
अशा सुपुत्रांच्या भूमीत
लाजाळूनं नमावं किती
फार दिवस झाले रक्तानं ताल धरून गाणं म्हणायला
दिशांचे कोन सांधायला
मुठी वळले हात पुढे सरतायत्
अख्खं विश्व पचवणारा हा अगस्ती वेगळाच आहे
चौथऱ्यांनीही आता पंख लावून उडायला सुरूवात केलीय् !

० ० ०

## आपण सर्व टांग्याचे घोडे

मी डोळे मिटून गपगार तळ्यात पडलेय्
रिंगण सोडून धावणाऱ्या घोड्याचा
उमदा पाय मोडलाय्
बहुधा त्याच्या सडक्या पायाला मुंग्या लागल्या असाव्या
खिळा ठोकला वाटं कपाळावर
फारच जड झालोत रक्तात भिजून
म्हणूनच फरफटत ओढले जात आहोत

कुठल्या खाटिकखान्याचा रस्ता आहे हा
कुठल्या पाण्याला लाच देऊन धुणाराहेत
आमच्या रक्ताळत्या पावलांचे चिरंजीव ठसे
असा कसा बरं वेश्यागमनी अंधार यांच्या नजरेतला
टपटपत जाणारे खूर चौखूर
उधळणारी लालभडक माती

कोवळी चाहूल टापांची नवथर थरथर पानांची वाट
सुकल्या डहाळ्यातून भुकेचा चंद्र
जळजळीत उष्ण होतेला
पुन्हा ... जोरात घोडदौड ...
आपण सर्व घोडे शर्यतीतले
निकामी झालेलो बळी ठरलेलो
तरीही दौडताहोत......

चंद्र माथ्यावर रणात अंगावर भाजतेला
सुक्या पानांनी गायलेलं गाणं
सुंदरसं काचतळ्याच्या घरातलं
-----.?------

आपण घोडे --
आपलं जीवन घोड्याच्या खोगिरासारखंच
लादलेलं आपल्याच तकलादू गाढव पाठीवर
आपण रडतखडत चाललोहोत
घोड्यांनाही मादक द्रव्याची चटक लागते ती अशी

आपण भरडले जाणारे उकडे तांदूळ
आपण भुश्यानं भरलेलं भोत
आपण टांग्याचे घोडे
आपण आलिशान देवळांच्या दगडी पायऱ्या

न् कधी कधी सुवर्णकळसावर शिटणारे
अभद्रसे कावळे
अन् आपण तारेवर टांगतेलं
भिजून चिप्प झालेलं जडशीळ गोणपाट
अन् किंवा आपण झाडाच्या पानावरली सुरवंट
वळवळती
निर्विकार
चैतन्यहीन

घोडे दमानं धावतायत् . . . . .
ढापणं निखळायला आलीयत् डोळ्यावरली
खिळे रूततील . . . . .
डोळ्यांचे ऋूस होतील
रक्ताच्या चिळकांड्या
हरकत नाही
रक्ताच्या थेंबांनीच पहारेकरी होऊन फाटकं उघडावीत

–घोड्यांची टपटपती फौज दौडतेय् दौडतेय्
आपण सर्व रेसचे घोडे
टांग्याचे घोडे
मुक्त होण्याची वेळ
म्हंजेच जगबुडी होण्याची वेळ एकच आहे

टापा ऐकू येताहेत
सागराची गाजही ....
टापा दौडताहेत दौडताहेत
आपण सर्व वारा प्यालेलो ---
घोडे उधळणारे......
खूर रक्ताळते ठसे मागं ठेवून पुढंपुढंच दौडताहेत
दौडताहेत
मी कमळ होऊन वर येतेली ......

० ० ०

## माझ्या मरतेल्या जाणिवा

माझ्या मरतेल्या जाणिवा
बुबुळं वासलेली स्वप्नं
कशी फांद्याफांद्यावर छान अडकवलीयत्
खाटिकखान्यात रक्तलांछित मांसाचे तुकडे
                    अडकवावेत तसे
कबाब हड्डी खिमा
शिजल्या मांसाचा दरवळ
ऑक्टोबर क्रांतीच्या ठिणगीवर
मी शिजत घातलेली माझी स्वप्नं
केव्हा उधाण येणार त्यांना
प्रत्येकजण आपल्या हातांची कलमं
        अलग ठिकाणी का लावतो
अखेर इथल्या प्रत्येक आईला वेश्या व्हावं लागेल काय ?
असल्या मृत शहराचा हिरोशिमा-नागासाकी का करत नाही ?
गिलोटिन उधारीनं मिळेल काय ?

० ० ०

## आषाढ

आजकाल आषाढातले ढग
चूपचाप निघून जातात
पाय न वाजवता
आयुष्यभर नुस्तच बरसणं चांगलं नसतं
हे त्यांनाही समजलंय्

## प्रतिक्षा

तू लावलेलं रातराणीचं झाड बहरून गेलंय्
उगाचच बहरण्याची तिची सवय जुनीच आहे
जुनाट खिडकीचे गज खिळखिळे झालेत
जिनाही करकर वाजतोय्

तुझ्यासाठी विणलेला स्वेटर
अजून पेटीत पडून आहे
त्यानंतर कधी थंडी आलीच नाही
रखरखीत उन्हाळा वर्षानुवर्ष

पारा उडालेल्या आरशासारखं आभाळ
किती दिवसात पंख असलेला पक्षी पाह्यलाच नाही
सगळंच कसं बेचव, कंटाळलेलं
आयुष्याच्या थकिस्त उंटावर

ही शब्दांची काडीही टाकू नकोस
कोसळून पडेल तो
घर....घराचं दार...सगळ ढासळतय्...थरथरतय्
रातराणी मात्र मनापासून आपली बहरतेय् बहरतेय्

० ० ०

## रुसलेल्या बहराला

रुसलेल्या बहराला कुणी विचारत नाही
पुनवेच्या चंद्रम्याला आता आभाळच नाही ।

शीड उभारून गेली नौका सागरात खोल
ऐकू आला नाही पुन्हा मला किनाऱ्याचा बोल ।

जागोजाग पडे सडा हिरेमाणकांचा सारा
माझ्या गळ्यातला सूर कुणी चोरून ग नेला ।

फुलं बागेत फुलली फुलं मनात झुरली
माळी आला नाही कधी फुलं उगीच फुलली ।

रुसलेल्या बहराला कुणी विचारत नाही
पुनवेच्या चंद्रम्याला आता आभाळच नाही ।

# स्वप्नांचा फास

साथ कुणाचीच नाही आता फक्त वाट उरे
माझ्या आयुष्याला पुन्हा दृष्ट सावलीची लागे ।

कधी येते आठवण वाट सारी जडावते
मागं वळून पहाता सारी बाग पेट घेते ।

आता सोहळा सुखाचा पुन्हा दुरून पहावा
गंध मरणाचा आता डोळे मिटून हा घ्यावा ।

अशा अधांतरी वाटा त्यांना नांवगांव नाही
तुझ्या मातीचाही स्पर्श माझ्या पावलांना नाही ।

जीव गुंतला तरीही किती तोडायचे पाश
माझ्या स्वप्नांनीच पुन्हा मला टाकला हा फास ।

## माझ्या पालखीची वाट

रात्र गळते थेंब पाकळी पाकळी
दिवसाचा देठ उरे धरे मेघाला काजळी ।।

दिशादिशांतून आल्या ऐकू श्रावणसतारी
माझ्या पदराच्या तारा झाले डोळे असावरी ।

अशा कितीक रातीला लागे खूळ वारा प्याले
चंद्रभान सागराला लागे आभाळ डोहाळे ।

अशा कितीक वाटांनी दाटदाटून उसासे
भर रातीत पेटले अंग उन्हाचं ग भासे
वाट पाहून पाहून कळा फुलून पहाट
आता वाऱ्याला पुसते माझ्या पालखीची वाट ।।

## निःसंग

खूप बहरल्या शब्दफुलांच्या हळव्या बागा
प्रतिक्षेत हा निवडुंगाचा पुढे ताटवा ।

जपला होता दवबिंदूचा स्वप्नफुलोरा
ग्रीष्म आता केसात माळूनी पहा जरा ।

गर्द जांभळया कातरवेळी जखम घेऊनी खोल
जिव्हारी
फिरून आज निःसंग रात्र तू तुझ्याचसाठी तूच
शिकारी ।

## विद्रोह

अस्पृश्याप्रमाणे प्रकाशालाही ठेवलं आम्ही वेशीबाहेर
इथल्या प्रस्थापित व्यवस्थेनं
माणसांना लिलावात मांडलेलं
ते पार विसरलेत

नुसत्या भिंती बांधून
त्यांची अस्मिता खच्ची करून
मरणारे नाहीत ते
त्यांच्या टाचेखाली दबल्या गेलेल्या
अनेक नसाधमन्यांना
सूर्यगर्भाचे धुमारे फुटतायत् असंख्य

देवनार खाटिकखाना, अत्याधुनिक शस्त्रात्रं
माणसाला मारण्याचे मार्ग सुधारले त्यांनी .
पोटाची खोळी कमी करता आली नाही त्यांना

हे सगळे भंगारातले किडे
पोट कापून डोक्यानं जगावं असं म्हणणारे
चंद्र तारे वैधिक भानगडी गुंतागुंत उकलताना
आतड्यांची पिळवणूक त्यांना का समजू नये
हा आपला माझ्या बालबुद्धीला पडलेला फालतू प्रश्न
ज्यानं त्यानं सोडवावेत आपापले प्रश्न
जमत नसल्यास शब्दरंजन कोडं
ते ही न जमल्यास कारकुनीत आकडेमोड करावी

नफातोट्यांची बेरीज वजाबाकी
जी आपल्या आयुष्याला टांग मारून गंडवते
आपणही बनतो अशानं शोषकांचे गुलाम
लाळघोटे स्तुतीपाठक
न् सूर्यगर्भाकडे पूर्ण दुर्लक्ष करून पाठ फिरवतो
चार भिंतींच्या अंधारात

आदिम सूर्यसूक्त तोंडपाठ करतो
गळा पिळवटून रडावं हमसून हमसून
शोकगीत म्हणताना
अन् चार फुलं टाकावी प्रेतावर
तशा चार कविता टाकून विधी संपतो
आयुष्यातल्या क्रियाकर्माचा कर्मभोगाचा

न् साऱ्या अर्थ अनर्थाचा
जे ओवाळून टाकतात आपलं घामेजलं थकलं भागलं
आयुष्य सूर्यगर्भावर
हुंकारतो गर्भ अस्पृश्य गर्भाशयातून
न् सूर्यदर्शन घडतं त्याला निखळ सत्य संघर्षाचं
विद्रोह विस्फोटाचं
नवं सूर्यसूक्त रचलं जातंय् काळजाच्या पानापानातून
अंकुरीत पालवीत

• • •

काव्य
२२८८५
२५०९

## माडीवर

मी जेव्हा गेले तिच्या माडीवर
अप्रूप उत्सुकतेनं
तिनं डोळे उघडून वर पाहिलं
मी सांगितलं नाही माझ्या येण्याचं कारण
आणि तिनंही विचारलं नाही
माहीत असल्यासारखं ती पूर्णविरामासारखी हसली

ती गहिरी संध्याकाळ मला पोटुशी वाटली तेव्हा
तिचे डोळे संध्याकाळला निरखताना तृप्त वाटले
पांढऱ्या बिछान्यावर ती प्राजक्ताच्या फुलासारखी
पडली होती
तिच्या शरीरावरून आजवर
अनेक कावळे शिटून गेले असतील
तरीही ती तितकीच निर्मळ वाटली मला

कृष्णकाळच्या मेघांची सावली
तिच्या पापण्यांनी अल्लाद बुबुळसूर्यावर धरली होती
ओठावरचं हसूसुद्धा समर्पण केल्यासारखं
येणाऱ्या दात्यासाठी तिनं ग्लास भरला
ग्लासमध्ये सोनसळी फेसात
उफाळून उसळून फुटणाऱ्या स्फुल्लिंगासारखी
तीं मला वाटली
तिच्या ढुळढुळणाऱ्या डोळ्यात
रात्रीचे पैंजण वाजले
आणि दर रात्रींच्या अटळ मृत्यूसाठी
ती जेव्हा रोमरोम सुन्न झाली
तेव्हा तिच्या रोमारोमातून
सारं जग मरून पडल्यासारखं वाटलं मला !

• • •

## रद्दबातल ठरवलेले

रद्दबातल ठरवलेले
आईच्या मरणप्राय वेणांना निरर्थक ठरवणारे
मुखवटा न घातलेले त्यांचे सडेतोड शब्द
अंगावर घुसमटून मेलेले उन्हाळे

उगाच अंगावरून वाहून गेलेले चार फाटके पावसाळे
अनुभवांच्या प्रचंड आभाळात
उडू पहाणारे त्यांचे मोजके घायाळ शब्दपक्षी

उगाच वाट पाहून ओसरलेल्या कुरळ केसांच्या लाटा
डोळे अथांग अर्थगर्भ आत्यंतिक हृद्यहसू
अपार वास्तवाला बिलगणारे
तुमच्या कलाबाज मखमली ठिसूळ घरात
विटाळशीसारखे ते सतत बाजूला
प्रत्येक पर्वात प्रत्येक युगात

असे मूर्ख एकलव्य जन्माला येतात
रद्दबातल ठरवले जातात
त्यांना मंजूर नसतं असहाय होऊन टाहो फोडणं
प्रत्येक प्लॅटफॉर्मवर अरण्यरूदन करणं
मग भिजल्या मांजरासारखं
कुठंतरी हेलपाटत रहायचं
या कडेपास्नं त्या कडेपर्यंत
त्यांच्या सर्जनशील मनाला नुस्तं छाटलेलंच आजवर
का बरं कलमं लावण्याचं धाडस नाही का कुणातच
त्यांचे पायच फक्त रूतत चाललेत
आणि हात अविरतपणं करतायत निर्मिती

असेही सव्यसाची
आयुष्यात अर्थ येण्याची वाट बघत बसणारे उगीचच
उगाचच प्रत्येक मोसमात स्वप्नांची वीण
अर्धमृत बीजांची
काही जन्मताक्षणी आयुष्यानंच खाल्लेली

सूर्याचे गर्भित अर्थ न् लक्तरं फाडणाऱ्या
ठिसूळ कलाबाजांनो,
आजला असे कर्ण यांच्यात पायलीला पन्नास मिळतील

० ० ०

# संभावित सूर्यासारखे

संभावित सूर्यासारखे तुम्ही नेहमीच निर्विकार असता
नित्यनेमाने पाठ फिरवून चालायला लागणारे

तुमचे विचार मुरलेल्या लोणच्यासारखे बंद बरणीत
सारं पंचतंत्र तोंडपाठ असतंय् तुम्हाला
तुम्ही हुकुमाचे पत्ते हातात ठेवूनच नेहमी खेळता

आमच्या आयुष्याच्या नाक्यानाक्यावर वासूगिरी
करणारे तुमचे लंपट शब्द
आमच्या सगळ्या आयुष्याला फोरासरोड करणारी
तुमची चवचाल नाण्यांची रास
तुमच्या घरांपुढं उच्च उदात्त विचारांची रांगोळी असते
रंगीत शोभिवंत ठिपक्याला ठिपके जोडून काढलेली
काचेरी बिलोरी शोकेसमध्ये
तुम्ही ठेवता चमकदार तत्वमूल्यं

सिग्रेट फुंकल्यासारखं तुम्ही बोलता
मानवतेच्या मूल्यांवर
हरीणडोळ्यांनी बघत असलेलं आमचं आयुष्य
किती दिवस करायची साठमारी
अशी स्वतःच्याच रक्ताची
खरंच का उधाणत नाही कणाकणातला तीव्र संताप
प्रत्येक शहराच्या नाक्यावरून पाण्याऐवजी
का नाही कारंजी उडत फुत्कारणाऱ्या रक्ताची
किती वेळ नुस्तं पहात रहाणार
बळी चाललेल्या बोकडांचे डोळे
प्रत्येकजण थडगी फोडून बाहेर का निघत नाही
या वारूळत्या शहरात रक्ताळलेला गुलमोहर
आणि गटाराच्या खिडकीत वेश्या होऊन पडलेली
पौर्णिमेची रात्र

मला हे पहायचं नाहीय्
आणि मला हे संपवायचंय् सगळं
असं डोळे मिटून काही होणाराय का
इथल्या प्रत्येक लहान पोराच्या
डोळ्यात असणारं वठलेलं झाड
इथल्या प्रत्येक आईचा पदर
असंख्य जळवांनी भरलेला
हे सगळं पहाताना डोळे मेणाचे होतात
आणि मन होतं अश्वत्थाम्याची चिरंजीव वेदना

० ० ०

## आम्ही अश्वत्थामा

किंग लियर
क्लिओपॅट्रा
इडिपस

अनभिषिक्त सम्राट
सिंहासनावर बसलेल्या त्यांच्या शोकांतिका
आणि त्यांनी केलेला अश्वमेध यज्ञ

दुःख कधी कुणाचं मांडलिक होऊ शकतं का
आमच्या दुःखाला आम्ही पिरॅमिडस् बांधले नाहीत

न् ताजमहालही उभारले नाहीत
आमची दुःख रात्रभर पाण्यात बुडूनही
जिवंत असलेल्या चिवट ओल्यांचिब चिचुंद्रीसारखी

आमच्या महत्वाकांक्षा वगैरे वगैरे
ताटकळत उभ्या ९-२५ च्या बसच्या रांगेत

आम्ही तडजोडीशी एकनिष्ठ
आमचा इतिहास आणि भविष्य

किंग लियर
क्लिओपॅट्रा
इडिपस
असे आणि येणारे अनेक
इतिहासांचे सम्राट
आम्ही अश्वत्थामा बनून हिंडणारे

० ० ०

# आम्ही नाही आहोत राजहंस

आम्ही नाही आहोत राजहंस
म्हणूनच कविता न् राजकारण
दूधातनं पाणी वेगळं काढावं तसं काढलं नाही

राजहंस मोत्यांचाच चारा खातो
राजहंस मरतानाच फक्त गाणं म्हणतो सुरेल
जसं आज हिटलरचे बापजादे म्हणतात
न् वहात्या वाऱ्याला टोपी फिरवून
अबाऊट टर्न करतात

या राजहंसांची पावलं पाण्यातली असतात
जमिनीवर चालताना हीच यांची पावलं
जमीन उधार घेतल्यासारखी चालतात

पावसाळ्यात कुत्र्यांच्या छत्र्या उगवतात ना मोसमी

किंवा माणसांनी छत्र्या उघडाव्यात फटाफट
भिजू नये म्हणून
असे मोसमी बचावात्मक शब्द यांचे

अलवार शेवाळातले बिसतंतू खाणाऱ्या
यांच्या चोची
आज किती बरं तोकड्या झाल्यात

हे राजहंस कधी चुकून
समुद्राच्या वाटचाला जात नाही बरं

तर सांगायची गोष्ट ही
हे राजहंस दूधपाण्यापासून
वाटेल त्या गोष्टीला वेगळं करू शकतात
दर दिवशी यांचा प्रत्येक शब्द न् शब्द
परदेशात जातो
न् करून घेतो प्लॅस्टिक सर्जरी मुखवटयावर

यांची कविता हे कमळाच्या पानावर लिहितात
कमळाचं पान कसं पाण्यापासून वेगळं न् अलिप्त असतं
यांच्यासारखंच

हे लिहितात कमळातल्या भुंग्याच्या
प्रणयक्रिडेवर, संभोगासनांवर

या राजहंसांना कानच नसतात
ते कधीच ऐकू शकत नाहीत
वणव्यांचं प्रदीर्घ कल्लोळगान

तर असे हे राजहंस
तुम्ही किती दिवस तुमच्या हातातले
मोती टाकणार आहात त्यांच्यापुढं

तुम्ही समुद्र आहात
आणि राजहंस कधी समुद्राच्या वाटचाला जात नसतात

० ० ०

## पिरॅमिडस्

मी चालले आहे एका जर्द काळ्या वाळवंटातून
दुधारी काचांच्या तुकड्यासारखी
पसरलेली वाळू तुडवते आहे

नीरव शांतता आणि निर्मनुष्य
आभाळ
वाळू
मी

प्रत्येक रात्री
पिरॅमिडस् कमळासारखी उमलतात
आणि त्यातली फरोह राजाराणीची प्रेतं खिदळतात

इथल्या गुलाम स्त्रीचं नग्न हसू
हाडाच्या सापळ्यावरले अलंकार

पिरॅमिडमधला अतिप्राचीन खजिना
बहरत्या तारुण्यासारख्या

रसरसत्या उन्हात मी वाहवले आहे
अनेक वाळूच्या वादळात हे सगळं पहाताना
मी वाळूची कधी झाले याचा पत्ताही लागला नाही मला

मीही रखरखून तापलेय्
इतर वाळूच्या कणांसारखी
वाईट केवढं की मला कुणी
स्फिनक्स भेटला नाही
आणि ईडिपसही नाही
मी आता वाहत वाहत ताजमहालाजवळ जाईन
तिथले दगड उमलायचेत अजून
अजून इथे पुष्कळ काही व्हायचंय्

मी वाहवेन देशभर गावभर
सांगेन की तुम्ही पिरॅमिडस् कधीच बांधू नका
माणसांनी माणसांची थडगी बांधू नये कधीच
तिथे पिरॅमिडस् उमलतात दगडफुलासारखे
इथल्या माणसांनी उमललेलं मला पहायचंय्

मी आता काळचा जर्द तापल्या वाळूतून
वहावत चाललेय्
वहावत चाललेय्

० ० ०

## वाळूचा प्रियकर

मी गोव्याच्या समुद्रकिनाऱ्यावर हिंडत होते
तिथल्या लाटांचे पक्षी फारच शुभ्र
उफाळणाऱ्या पंखांचे
मी त्यांच्या पाठीवर अल्लाद माझं हृदय ठेवलं होतं
मला आठवतं
तेव्हा मी वाळूवर माझ्या प्रियकराचं नाव कोरलं होतं

खिदळणाऱ्या पावसाच्या घोड्यानं
वाळू तुडवली म्हणून रडणारी मी
म्हाताऱ्या आण्टीच्या झोपडीत शिरताना पाह्यलं तर..
आण्टीचा पोरगा वाळूचं शरीर घेऊन पडला होता
त्याच्या हाताचे क्रूस झाले होते
आणि कोरे कपडे फडफडत होते
जणू उन्हाळ्यात पक्षी स्थित्यंतर करतात
दुसऱ्या प्रदेशात

तसं त्यांनाही आता जायचं होतं

आण्टीच्या मुलाची कॉफीन
आण्टी तशीच उभी
निर्ढावलेल्या पांढऱ्याफटक तटस्थ अचलशा चर्चसारखी
तिची पांढरीशुभ्र स्तब्धता पाहून
प्रार्थनेचे सूर निमूट बारमध्ये घुसले

प्रियकराची चुंबनं आठवत रोमांच्याच्या पावसात
विरघळणारी मी
आण्टीच्या पुढ्यात मी मलाच मेणबत्ती म्हणून ठेवून दिलं
आताशा तिला बायबल वाचताना कमी दिसतं म्हणून

आता आण्टीच एक जिवंत समुद्र झालीय्
आणि माझी वाळू दूर पलिकडे दारू पित बसलीय्
पण मी मागं वळूनही पाह्यलं नाही
की माझ्या प्रियकराचं नाव आहे की नाही

आता गोव्याच्या समुद्राला किनाराच नाहीय्
आणि आता माझ्या शरिरातनं
एक वाळूचा प्रियकर खाली घरंगळत
नाहीसा होत चाललाय्

० ० ०

## मी सावलीत बसून ऊन पहात होते ते दिवस

खरं तर त्यावेळी मला उन्हाचं वयही माहीत नव्हतं
फक्त तप्तसूराचे प्रतिध्वनी
न् मी सावलीत बसून ऊन पहात होते ते दिवस

ज्यावेळीं माझ्या शब्दांना वास्तवाचं स्वयंभू अस्तित्व
माहीत नव्हतं
माझ्या जाणिवा फक्त सागरगोटयांच्या
उडत्या मर्यादरेषेपर्यंत होत्या
आणि कोंबडयांची झुंज मी दुरून पहात होते
फडफडून गळणाऱ्या पीसांचा
दुःखदायी अर्थ मला कळत नव्हता
तेव्हा मी स्थितीशील होते
आणि दररोज रात्री मी रंगपेटी उशाशी घेऊन झोपत होते
स्वप्नांचे मनोरम चौरस गोलक रंगवण्यासाठी

जेव्हा उन्हाचा रंग मला कळला
मी स्वतःला पाह्यलं
आणि मला जाणवलं
माझ्या अस्तित्वाला रंग द्यायला
रंगच उरला नव्हता रंगपेटीत

स्वप्नांचे अर्थ झाले होते असहाय असमर्थ
माझं अस्तित्व जणू एक कोरा शून्यबिंदू
उन्हाची एकच एक जळती चाहूल
संगमरवरी स्वप्नमहाल नुसत्या
झळांच्या कल्पनेनं तडकतोय्
आज स्वप्नांना अर्थ उरलाय् फक्त ताजमहालाइतकाच
सौंदर्यशाली प्रदर्शनीय

जेव्हा मी उन्हाचा आवाज ऐकला
खरंच तेज पांघरण्याचं खूळ
मला अजून का लागलं नाही
ती उन्हाची तिरीपचाहूल
जीवघेणी
भोवंडून सोडणारी

आणि अचानक मी पाह्यलं
माझ्या अस्तित्वानं डोळे उघडून सभोवार बघितलं
त्या नितळ कोवळ्या डोळ्यात

स्वप्नांची घनगर्द दाटी नव्हती
दाहक जिव्हारी जखमेसारखा तेजाळता क्षण
मी त्या उन्हाला बिनतक्रार स्विकारलं तो दिवस

तरीही सावली आणि माझं तारांकित स्वप्नदायी आभाळ
वाया गेलेला पाण्याचा ओघळ
असं मी कधीच म्हटलं नाही
तप्तसूरांच्या प्रखर तारांवर मी छेडले गेले
साऱ्या अणूरेणूत भरून राह्यलं ते तेजाळ अस्तित्व

आज मी साऱ्या घराच्या दारंखिडक्या उघडतेय्
माझे डोळे निखळ स्वच्छ निर्भर
उन्हानं माझं आयुष्य काठोकाठ व्यापलं तो दिवस

आता ऊनही वाटू लागलंय्
पांघरलेल्या उबदार शालीसारखं
आणि आज मला आता
उन्हातूनही पलिकडे पहायचंय्

० ० ०

## रात्रीचा पहिला प्रहर

रात्रीचा पहिला प्रहर
मी माझ्या पदराला शिवून टाकत होते
आणि तरी तो प्रत्येक वेळी केव्हा उठून निघून जात होता
हे मला कळत नव्हतं

सकाळ झाली की मी
मटकन् समुद्रात बुडायचे
सरतेशेवटी बिछाना रिकामाच असायचा
आणि मीही ओहोटलेली

हातात सुईदोरा आहे म्हणून
सगळं कायमचं शिवून टाकता येतं थोडंच
मी स्वतःला उसवू लागले
तर तेही जमेना
पहायला गेले
तर माझ्या अंगाला
सकाळच्या किरणांचे चारदोन धागे घट्ट चिकटलेले

## एक सूडचक्र

सरतेशेवटी मीही एका सूडचक्राचं अपरिहार्य चक्र होते
जे माझी इच्छा नसताना माझ्याजवळ येऊन थांबलं होतं

तू म्हणतोस ते कदाचित खरंही असेल की,
सूडावर माणूस जगत नसतो
मग आजवर जगण्याच्या इतिहासापेक्षा
सूडाचे इतिहासच का रे उरले

खरंच मला आता थांबता येत नाही कुठे
आलेल्या प्रत्येक वादळाबरोबर मी वाहात गेले

आणि अरे,
ज्यांना फक्त वाहात जाणंच माहीत आहे
ते उद्ध्वस्त होतातही आणि करतातही दुसऱ्यांना

ते उद्ध्वस्तपण त्या जगण्याइतकंच खरं असतं
आणि म्हणून अक्षम्य असतं

तू कधी स्वतःचं मांस कापून चाखलंयस ?
तसं करताना
तुझ्या डोळ्यांत जर पाणी आलं नसेल
तर तू निश्चित पाह्यलं असशील
त्या अर्धतुटल्या पेशी
फडफडताना तडफडताना

त्यावरही तू सॉक्रेटिससारखं भाष्य करशील
की चक्क हॅम्लेटचा आव आणशील
हे मलाही माहीत नाही
पण त्यावेळी
तुझ्या डोळ्यांतल्या पाण्याहून
ती तुटलेली पेशी खरी असते

मी माझं समर्थन करत नाहीय
पण आज माझं रक्त नासून चाललंय
माझं मांस झडत चाललंय
मी हे सूडचक्र थांबवण्याचा आटोकाट प्रयत्न करतेय
आणि आता मला हेच समजेनासं झालंय
की मी चक्र थांबवणारा हात आहे
की चक्राला गती देणारा मध्यबिंदू

० ० ०

## भंगारात टाकलेलं त्याचं आयुष्य

भंगारात टाकलेलं त्याचं आयुष्य
त्याचे शब्दही आता वृद्धाश्रमात रहातात
टाकावू म्हाताऱ्यांसारखे
आयुष्यभर तोही सरळच चालला
जिराफासारखी लांब मान करत,
तडजोडीच्या प्रत्येक झाडाशी त्यानं जमवून घेतलं
ओझी वाहणारी सगळीच गाढवं नसतात हे खरं
तरीही बिनतक्रार त्यानं तेही स्विकारलं
माणसाची व्याख्या करणारे
नाक्यानाक्याला भेटले त्याला
पोटाची व्याख्या सांगणारे शब्द
फक्त त्यांनी सांगितले नाहीत
सजवलेल्या तारांकित रस्त्यानं तो गेलाही असता
पण पावलांना सवय पडून गेली होती
बिनचूक वळणानं जायचं निमूट
न् आज जेव्हा तो दुभंगला जातोय
तेव्हा मातीही
आत्यंतिक आपुलकीनं त्याच्याजवळ गेली नाही
त्याला मातीची ओढ नव्हती असं नाही
जमिनीलाच गुरुत्वाकर्षण उरलं नव्हतं.

० ० ०

# पुन्हा एका शहराची आत्महत्या

दूर शहर पेटलेलं
मध्ये समुद्र
शहर तगमगत उभं
जणू त्यानं आयुष्यात कधी स्वप्नच पाह्यलं नंसावं
निऑनसाईनचे हात उंचावून
ते भीक मागत होतं स्वप्नांची
हे शहर इतकं अनाथ पोरकं
गाड्यातनं फिरणारे त्याचे खुज आई-बाप
विझून गेलेत
पुसून गेलेत त्याच्या आयुष्यातून
नको माझ्याकडे येऊ नको
माझ्याकडे स्वप्नं आहेत
पण त्यांना जमीन नाही
तुझ्याकडे जमीन आहे
पण कोण मशागत करणार त्याची ?

तुझ्या शरिरावरून सरपटणारी माणसं
तुझ्या पापण्या कुरतडून खाऊन टाकतील ती स्वप्नं
किंवा वॉलहँगिग सारखी अडकवून ठेवतील घरात
शहरानं मान हलवली
निऑनसाईनचे रस्ते कुत्सितपणं हसले
लांवरुंद जिवणी फाकवत
सगळं असह्य झालंय्
शहर पावलं टाकत हळूहळू समुद्राजवळ जातय्
पावलं बुडाली, लाटा वाढल्या
माझी स्वप्नं निरर्थक हलू लागतात
जणू त्यांना कुणी फाशी दिलंय्
मी माझे डोळे काढुन ठेवू का ?
शहरांच्या आत्महत्या वघून डोळे थकून गेलेत

# ऋणनिर्देश

दिवंगत लोकशाहीर **अमर शेख** ह्यांची धाकटी मुलगी मलिका अमर शेख हिचा 'वाळूचा प्रियकर' हा पहिला कवितासंग्रह. मलिकेच्या अवघ्या विसाव्या वर्षी तो प्रसिद्ध होत आहे.

माझ्या आठवणीप्रमाणे मलिका तिच्या सातव्या वर्षापासूनच कविता गुणगुणू लागली. त्या ओळी दुसऱ्या कुणा इतर कवीच्या नसत. स्वतः तिच्याच मनाने केलेली ती रचना असे. तिच्या या रचनेचे आणि गुणगुणण्याचे तिच्या वडिलांना– अमर शेख यांना– फार कौतुक असे. पण आमचे दुर्दैव असे की, तिचे हे कौतुक पाहायला आज ते आमच्यात नाहीत.

'वाळूचा प्रियकर' प्रकाशित करताना तसे पुष्कळांचे साहाय्य झाले. पण ज्यांचा उल्लेख अवश्य करावाच लागेल असे दोघे म्हणजे दलित पँथरचे नेते श्री. नामदेव ढसाळ आणि श्री. भोसले.

सर्वांची मी फार ऋणी आहे.

**—ज्योती अमर शेख**

शाहीर अमर शेख यांचे
एक नितान्तसुंदर पुस्तक

**क ल श**

क ल श या पुस्तकातील प्रत्येक कविता चित्रित केलेली आहे. चित्रे इतकी सुंदर आहेत की, ती जणू मूळ कवितेशी जुगलबंदीच करीत आहेत. कविता आणि रेखाचित्रे यांची जुगलबंदी इतकी जमून आली आहे की रविशंकर आणि तिरखवा यांचीच आठवण व्हावी.

चित्रकार आहेत अमर शेखचे एक निकटवर्ती स्नेही श्री. व्ही. व्ही. साठे. आणि प्रकाशन आहे पुण्याच्या कॉन्टिनेन्टल प्रकाशनचे.

REFBK-0022775

REFBK-0022775

